# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

**सभा क्र.४/२०२३** **दिनांक २०/०२/२०२३**
**स्थळ- साईनिवास अतिथीगृह,शिर्डी** **वेळ- दुपारी ४.०० वा.**

मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद येथील जनहित याचिका नं.९८/२०२१ व (सिव्हील ॲप्लीकेशन नं.११९७३/२०२१) यावर दि.१३/०९/२०२२ रोजी मा.न्यायालयाने दिलेल्या आदेशान्वये श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीकरीता नियुक्त केलेल्या तदर्थ (Ad-hoc) समितीची सभा सोमवार दि.२०/०२/२०२३ रोजी दुपारी ४.०० वा. संस्थानचे शिर्डी येथील साईनिवास अतिथीगृहामध्ये आयोजित करणेत आली असलेबाबत जा.नं.एसएसएस/वशी-०४/४५५९/२०२३, दि.१७.०२.२०२३ अन्वये सर्व मा.सदस्यांना कळविण्यात आलेले होते.

त्यानुसार तदर्थ (Ad-hoc) समितीची सभा सोमवार दि.२०/०२/२०२३ रोजी दुपारी ४.०० वा. संस्थानचे शिर्डी येथील साईनिवास अतिथीगृहामध्ये मा.श्री.सुधाकर यार्लगड्डा, प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहमदनगर यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आली.

**या सभेस खालील मा.सदस्य उपस्थित होते.**

**मा.श्री.सुधाकर यार्लगड्डा,**
**प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहमदनगर तथा**
**अध्यक्ष, तदर्थ (Ad-hoc) समिती,**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.**

**मा.श्री. सिध्दाराम सालीमठ, भा.प्र.से.**
**जिल्हाधिकारी, अहमदनगर तथा**
**सदस्य, तदर्थ (Ad-hoc) समिती,**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.**

**मा.श्री.राहूल जाधव,**
**उपमुख्य कार्यकारी अधिकारी तथा**
**प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.**

---

**विषय नं.१ दि.०५.०२.२०२३ रोजी अहमदनगर येथे झालेल्या मा.तदर्थ (Ad-hoc) समिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.**

**निर्णय क्र.८५ दि.०५.०२.२०२३ रोजी अहमदनगर येथे झालेल्या मा.तदर्थ (Ad-hoc) समिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करतांना त्यामध्ये खालील प्रमाणे दुरुस्त्या करण्यात आल्या व त्यास मान्यता देण्यात आली.**

निर्णय क्र.८२- संस्थान कायम कर्मचारी, कंत्राटी कर्मचारी व आऊटसोर्स कंत्राटी कर्मचारी यांचे वेतन व भत्ते यांचा खर्च विश्वस्त निधीमध्ये दर्शविलेला आहे. श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम-२००४ चे तरतुदीनुसार सदरचा खर्च व्यवस्थापन निधीमधुन करणे आवश्यक असल्याने तूयाप्रमाणे अंदाजपत्रकात सुधारणा करण्यात यावी. सुधारीत अंदाजपत्रकातील खर्चाची रक्कम रु.१७८ कोटी पैकी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम-२००४ चे कलम २२ मधील तरतुद क्रमांक २ मधील नियम क्र.२ नुसार न्यासाचे सन २०२१-२२ चे एकुण उत्पन्न ४३६.९५ कोटी चे १० टक्के रक्कम रु.४३.६९ कोटी व्यवस्थापन निधीत वर्ग करुन त्या खर्चास मान्यता देण्यात येत आहे. तसेच सन २०२३-२४ चे मुळ अंदाजपत्रकातील खर्च रक्कम रु.२२९ कोटी पैकी आर्थिक वर्ष २०२२-२३ च्या एकुण प्रस्तावीत अंदाजे रक्कम रु.८३५ कोटी उत्पन्नाच्या १० टक्के रक्कम रु.८३.५० कोटी व्यवस्थापन निधीत वर्ग करुन त्या खर्चास मान्यता देण्यात येत आहे. व्यवस्थापन निधीत दर्शविलेल्या उर्वरीत खर्चास (संस्थान कायम कर्मचारी, कंत्राटी कर्मचारी व आऊटसोर्स कंत्राटी कर्मचारी यांचे वेतन व भत्ते इ. खर्चास) शासनाची विहीत पध्दतीने मान्यता घेण्यात यावी. तत्पुर्वी मा.उच्च न्यायालयात सिव्हील ॲप्लीकेशन दाखल करुन मान्यता घेण्यात यावी. मा.उच्च न्यायालयाचे व शासनाचे मान्यतेस अधिन राहून आर्थिक वर्ष २०२३-२४ चे मूळ अंदाजपत्रक व आर्थिक वर्ष २०२२-२३ चे सुधारीत अंदाजपत्रकास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-लेखाशाखा/विधी विभाग)

**या ऐवजी खालील प्रमाणे वाचण्यात यावे.**

**निर्णय क्र.८२- संस्थान कायम कर्मचारी, कंत्राटी कर्मचारी व आऊटसोर्स कंत्राटी कर्मचारी यांचे वेतन व भत्ते यांचा खर्च विश्वस्त निधीमध्ये दर्शविलेला आहे. श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम-२००४ चे तरतुदीनुसार सदरचा खर्च व्यवस्थापन निधीमधुन करणे आवश्यक असल्याने त्याप्रमाणे अंदाजपत्रकात सुधारणा करण्यात यावी. सुधारीत अंदाजपत्रकातील संस्थान खर्चाची रक्कम रु. १७८ कोटी व रुग्णालये खर्चाची रक्कम रु. ८२ कोटी असे एकुण रककम रु. २६० कोटी पैकी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम- २००४ चे कलम २२ मधील तरतुद क्रमांक २ मधील नियम क्र. २ नुसार न्यासाचे सन २०२१- २२ चे एकुण उत्पन्न ४३६.९५ कोटी चे १० टक्के रक्कम रु.४३.६९ कोटी व्यवस्थापन निधीत वर्ग करुन, त्या खर्चास मान्यता देण्यात येत आहे. तसेच सन २०२३-२४ चे मुळ**

**अंदाजपत्रकातील संस्थान खर्चाची रक्कम रु.२२९ कोटी व रुग्णालये खर्चाची रक्कम रु. ८६ कोटी असे एकुण रक्कम रु. ३१५ कोटी पैकी आर्थिक वर्ष २०२२-२३ च्या एकुण प्रस्तावीत अंदाजपत्रकानुसार रक्कम रु.८३५ कोटी उत्पन्नाच्या १० टक्के रक्कम रु.८३.५० कोटी व्यवस्थापन निधीत वर्ग करुन त्या खर्चास मान्यता देण्यात येत आहे. व्यवस्थापन निधीत दर्शविलेल्या उर्वरीत खर्चास (संस्थान कायम कर्मचारी, कंत्राटी कर्मचारी व आऊटसोर्स कंत्राटी कर्मचारी यांचे वेतन व भत्ते इ. खर्चास) शासनाची विहीत पध्दतीने मान्यता घेण्यात यावी. तत्पुर्वी मा. उच्च न्यायालयात सिव्हील ॲप्लीकेशन दाखल करून मान्यता घेण्यात यावी, मा.उच्च न्यायालयाचे व शासनाचे मान्यतेस अधिन राहून, आर्थिक वर्ष २०२३-२४ चे मूळ अंदाजपत्रक व आर्थिक वर्ष २०२२-२३ चे सुधारीत अंदाजपत्रकास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही-लेखाशाखा/विधी विभाग)**

---

**विषय नं.२ चक्रिय पध्दतीने मान्यता दिलेले विषय वाचून कायम करणे.**

**१. जानेवारी-२०२३ ते मार्च-२०२३ या कालावधीसाठी स्विस चॅलेंज पध्दतीने गाईचे शुध्द तूप खरेदीबाबत.**

**निर्णय क्र.८६/१ चक्रिय पध्दतीने घेण्यात आलेल्या निर्णयाचे अवलोकन करुन नोंद घेण्यात आली.**

**(कार्यवाही- खरेदी विभाग)**

---

**२. श्रीमती संगिता शशिकांत कुमावत, परिचारीका, श्री साईबाबा हॉस्पिटल यांचा सेवेत रुजू करुन घेण्याबाबतचा अर्ज.**

**निर्णय क्र.८६/२ चक्रिय पध्दतीने घेण्यात आलेल्या निर्णयाचे अवलोकन करुन नोंद घेण्यात आली.**

**(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

**विषय नं.३ सन २०२३-२४ करीता श्री साई प्रसादालयातील प्रसादभोजनामध्ये स्वामी नारायण पोळी (चपात्या) /पुरी मनुष्यबळाव्दारे तयार करणेकामी विविध वृत्तपत्रामध्ये जाहिरात देऊन ई-निविदा मागविणेस व येणा-या खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.८७ प्रस्ताव मंजूर. खर्चाची रक्कम रु.५० लाखापेक्षा जास्त असल्याने मा.उच्च न्यायालय, मुंबई, खंडपीठ औरंगाबाद येथे सिव्हील ॲप्लीकेशन दाखल करण्यात यावे.**

**(कार्यवाही- श्री साई प्रसादालय/विधी विभाग)**

---

**विषय नं.४** **सन २०२३-२४ करीता श्री साई प्रसादालयातील प्रसादभोजनामध्ये चपाती मशिनव्दारे चपाती तयार करणेकामी विविध वृत्तपत्रामध्ये जाहिरात देऊन ई-निविदा मागविणेस व त्याकामी येणा-या खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.८८** **प्रस्ताव मंजूर.**

**(कार्यवाही- श्री साई प्रसादालय)**

---

**विषय नं.५** **सन २०२३-२४ करीता श्री साई प्रसादालयामार्फत मनुष्यबळाव्दारे अन्नपाकीटे (नाष्टापाकीटे) तयार करणेकामी विविध वृत्तपत्रामध्ये जाहिरात देऊन ई-निविदा मागविणेस व येणा-या खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.८९** **प्रस्ताव मंजूर. खर्चाची रक्कम रु.५० लाखापेक्षा जास्त असल्याने मा.उच्च न्यायालय,मुंबई, खंडपीठ औरंगाबाद येथे सिव्हील ॲप्लीकेशन दाखल करण्यात यावे.**

**(कार्यवाही- श्री साई प्रसादालय/विधी विभाग)**

---

**विषय नं.६** **श्री साई प्रसादालयातील हाऊसकिपींग/स्वच्छता व पेस्ट कंन्ट्रोलचे काम तसेच दररोज वाढपी कामगार आऊटसोर्सिंग पध्दतीने पुरविणेकामी विविध वृत्तपत्रामध्ये जाहिरात प्रसिध्द करुन ई-निविदा मागविणेस व येणा-या खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.९०** **प्रस्ताव मंजूर. खर्चाची रक्कम रु.५० लाखापेक्षा जास्त असल्याने मा.उच्च न्यायालय, मुंबई, खंडपीठ औरंगाबाद येथे सिव्हील ॲप्लीकेशन दाखल करण्यात यावे.**

**(कार्यवाही- श्री साई प्रसादालय/विधी विभाग)**

---

**विषय नं.७** **श्री साईभक्तांच्या प्रसाद भोजन सुविधेसाठी साई प्रसादालयास सन २०२३-२४ या वर्षाकरीता लागणारा भाजीपाला खरेदीबाबत.**

**निर्णय क्र.९१** **प्रस्ताव मंजूर. खर्चाची रक्कम रु.५० लाखापेक्षा जास्त असल्याने मा.उच्च न्यायालय, मुंबई, खंडपीठ औरंगाबाद येथे सिव्हील ॲप्लीकेशन दाखल करण्यात यावे.**

**(कार्यवाही- श्री साई प्रसादालय/विधी विभाग)**

---

**विषय नं.८**

**१. श्री साई प्रसादालयातील हाऊसकिपींग/स्वच्छता व पेस्ट कंन्ट्रोलचे काम तसेच दररोज वाढपी कामगार आऊटसोर्सिंग पध्दतीने पुरविणेकामी सध्या कार्यरत असलेले ठेकेदार यांना मुदतवाढ देणेबाबत.**

**२. श्री साई प्रसादालयामार्फत आऊटसोर्स पध्दतीने अन्नपाकीटे (नाष्टापाकीटे) तयार करणेकामी सध्या कार्यरत असलेले ठेकेदार यांना मुदतवाढ देणेबाबत.**

**३. श्री साई प्रसादालयामार्फत मनुष्यबळाव्दारे आऊटसोर्स पध्दतीने स्वामी नारायण चपाती /पुरी  तयार करणेकामी सध्या कार्यरत असलेले ठेकेदार यांना मुदतवाढ देणेबाबत.**

**४. श्री साई प्रसादालयातील चपाती मशिनवर आऊटसोर्स पध्दतीने मनुष्यबळ पुरवून चपाती तयार करणेकामी सध्या कार्यरत असलेले ठेकेदार यांना मुदतवाढ देणेबाबत.**

**निर्णय क्र.९२** **सी.ए. दाखल करुन पुर्व परवानगी घेण्यात यावी. ई-निविदा प्रकिया पुर्ण होण्यास विलंब होत असल्यास आवश्यकता भासल्यास प्रस्तावात नमुद केल्याप्रमाणे मुदतवाढ देण्यास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही- श्री साई प्रसादालय/विधी विभाग)**

---

**विषय नं.९** **साईआश्रम भक्तनिवास व साई धर्मशाळा या दोन्ही विभागाकडील इमारतीमध्ये व परिसरात पेस्ट कंट्रोल करणेकामी दैनिक वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिध्द करुन ई-निविदा प्रक्रिया राबविणेस मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.९३** **प्रस्ताव मंजूर.**

**(कार्यवाही- साई धर्मशाळा)**

---

**विषय नं.१०** **सन २०२३-२४ करीता साईआश्रम भक्तनिवास, साई धर्मशाळा विभागाकडील यांत्रिकीकरणासह हाऊसकिपींग, विद्युत, प्लंबीग, स्वच्छता इ.दुरुस्ती व देखभालीची कामे व व्दारावती भक्तनिवास विभागाकडील यांत्रिकीकरणासह हाऊसकिपींग / स्वच्छता कामाकरीता दैनिक वर्तमान पत्रात जाहिरात प्रसिध्द करुन ई-निविदा मागविणेस व त्याकामी येणा-या खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.९४** **अपेक्षीत खर्चात २० टक्के वाढ गृहीत धरुन ई-निविदा प्रक्रिया राबविणे ऐवजी किमान वेतनात झालेल्या वृध्दीचा दर विचारात घेऊन १० टक्के वाढ गृहीत धरुन तसेच आर्थिक वर्षाअखेर पर्यंत म्हणजेच दि.३१.०३.२०२४ पर्यतचे कामासाठी ई-निविदा बोलविण्याची दुरुस्ती करुन प्रस्ताव मंजूर करण्यात आला. रक्कम ५० लाखापेक्षा जास्त असल्याने सी. ए. दाखल करण्यात यावा.**

**(कार्यवाही- व्दारावती भक्तनिवास/विधी  विभाग)**

---

**विषय नं.११** **नवीन दर्शनरांग प्रकल्पातंर्गत विविध काऊंटरसाठी ४५ नग नवीन संगणके व ४५ नग प्रिंटर्स प्रचलीत पध्दतीने खरेदी करणेकामी येणा-या खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.९५** **लेझर प्रिंटर्स वायरलेस सुविधेसह घेण्याबद्दल सविस्तर माहितीसह प्रस्ताव सादर करावा. EPSON प्रिंटर्स थेट उत्पादकाकडून काय दराने मिळणार आहे याची माहिती घेऊन प्रस्ताव सादर करावा. प्रस्ताव तहकुब.**

**(कार्यवाही-माहिती व तंत्रज्ञान विभाग)**

---

**विषय नं.१२** **मोतीचुर लाडू व बर्फी प्रसाद पॅकिंग करणे इ.कामांसाठी नविन ठेकेदार नियुक्तीची ई-निविदा प्रक्रिया पुर्ण होईपावेतो सध्याचे नियुक्त ठेकेदार यांना आहे त्याच अटी-शर्तीवर मंजुर दराने मुदतवाढ देणेस मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.९६** **सी.ए. दाखल करुन पुर्व परवानगी घेण्यात यावी. ई-निविदा प्रकिया पुर्ण होण्यास विलंब होत असल्यास आवश्यकता भासल्यास प्रस्तावात नमुद केल्याप्रमाणे मुदतवाढ देण्यास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही- लाडू व बर्फी प्रसाद निर्मिती विभाग/विधी विभाग)**

---

**विषय नं.१३** **सन २०२३-२४ करीता अकुशल, कुशल कंत्राटी कर्मचारी पुरविणेकामी नविन लेबर कॉन्ट्रक्टर्सची नेमणूक करण्यासाठी निवीदा मागविणेस मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.९७** **प्रस्ताव मंजूर. सी.ए. दाखल करुन पुर्व परवानगी घेण्यात यावी. ई-निविदा प्रकिया पुर्ण होण्यास विलंब होत असल्यास आवश्यकता भासल्यास सध्याचे ठेकेदार यांना आहे त्याच दरात एक महिना कालावधीसाठी मुदतवाढ देण्यास मान्यता देण्यात आली.**

**पुजारी, उपपुजारी इत्यादी पदांचे भरतीबाबतचा प्रस्ताव लवकरात लवकर सादर करावा.** **(कार्यवाही-कामगार विभाग/विधी विभाग)**

---

**विषय नं.१४** **सन २०२३-२४ करीता कंत्राटी सुरक्षा व माजी सैनिक सुरक्षा कर्मचारी पुरविणेकामी नविन सिक्युरीटी कॉन्ट्रक्टरची नेमणूक करण्यासाठी निवीदा मागविणेस मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.९८** **प्रस्ताव मंजूर. सी.ए.दाखल करण्यात यावा.**

**(कार्यवाही-कामगार विभाग/विधी विभाग)**

---

**विषय नं.१५** **संस्थान कंत्राटी कामगारांना संस्थान सेवेत नियमित नेमणूका देणेबाबत.**

**निर्णय क्र.९९** **अभ्यास करण्याची आवश्यकता आहे. तहकुब.**

**(कार्यवाही-सामान्य प्रशासन विभाग)**

---

**विषय नं.१६** **संस्थानचे मंजूर आकृतीबंधातील कंत्राटी पदांवर ११ महिन्यांकरीता कंत्राटी पध्दतीने नेमणूक करण्यात आलेल्या कंत्राटी कर्मचा-यांना सेवा रजा विनियम-२०१३ नुसार रजा, सुट्टया लागू करणेबाबत.**

**निर्णय क्र.१००** **तहकुब.**

**(कार्यवाही-सामान्य प्रशासन विभाग)**

---

**विषय नं.१७** **श्री साईबाबांचे पादुका दर्शन सोहळयाचे आयोजनाकामी नियमावली व समिती गठीत करणेबाबत.**

**निर्णय क्र.१०१** **तहकुब.**

**(कार्यवाही-सामान्य प्रशासन विभाग)**

---

**विषय नं.१८** **संस्थान आस्थापनेवरील कंत्राटी कर्मचारी यांचा दि.१.११.२०२१ ते दि.३१.०३.२०२२ या कालावधीतील कर्मचारी राज्य विमा (ESIC) रकमेचा भरणा करणेबाबत.**

**निर्णय क्र.१०२** **तहकुब.**

**(कार्यवाही-सामान्य प्रशासन विभाग)**

---

**विषय नं.१९** **श्री.राहूल रामचंद्र इंगवले, सेवा निलंबीत मदतनीस, विद्युत विभाग यांचे दि.२०.१०.२०२२ रोजीचे खाते चौकशी निष्कर्ष अहवालाबाबत.**

**निर्णय क्र.१०३** **तहकुब.**

**(कार्यवाही-सामान्य प्रशासन विभाग)**

---

**विषय नं.२०** **श्री.भारत वेणूनाथ लावरे, मदतनीस, कॅन्टीन विभाग यांचे दि.०८.१२.२०२२ रोजीचे खाते चौकशी निष्कर्ष अहवालाबाबत.**

**निर्णय क्र.१०४** **तहकुब.**

**(कार्यवाही-सामान्य प्रशासन विभाग)**

---

**विषय नं.२१** **श्री.राजेंद्र सोपानराव जगताप, सेवा निलंबीत प्र.प्रशासकीय अधिकारी, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचे दि.१७.११.२०२२ रोजीचे खाते चौकशी निष्कर्ष अहवालाबाबत.**

**निर्णय क्र.१०५ तहकुब.**

**(कार्यवाही-सामान्य प्रशासन विभाग)**

---

**विषय नं.२२ श्री.विनोद गोवर्धन कोते, सेवा निलंबीत प्र.सीसीटीव्ही विभाग प्रमुख, सीसीटीव्ही विभाग यांचे दि.१७.११.२०२२ रोजीचे खाते चौकशी निष्कर्ष अहवालाबाबत.**

**निर्णय क्र.१०६ तहकुब.**

**(कार्यवाही-सामान्य प्रशासन विभाग)**

---

**विषय नं.२३ श्री.चेतक चांगदेव साबळे, सेवा निलंबीत मदतनीस, सीसीटीव्ही कंट्रोल सेल विभाग यांचे दि.१७.११.२०२२ रोजीचे खाते चौकशी निष्कर्ष अहवालाबाबत.**

**निर्णय क्र.१०७ तहकुब.**

**(कार्यवाही-सामान्य प्रशासन विभाग)**

---

**विषय नं.२४ श्री रामनवमी उत्सव-२०२३ आयोजित करावयाच्या सांस्कृतीक कार्यक्रमासाठी कलाकार व मानधन निश्चीत करणेबाबत.**

**निर्णय क्र.१०८ अ.नं.१,४,६,७ व ९ पैकी कार्यक्रमाचे रुपरेषेची माहिती घेऊन प्र.मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी तीन टिमची निश्चीती करण्यास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही-सामान्य प्रशासन विभाग)**

---

**विषय नं.२५ श्री रामनवमी उत्सव-२०२३ मधील श्रींच्या फोटो व पोथीच्या मिरवणूकीत वीणा, पोथी, फोटो, पाद्यपुजा तसेच रुद्राभिषेक इत्यादी कार्यक्रमासाठी मान्यवरांची नावे निश्चित होणेबाबत.**

**निर्णय क्र.१०९ श्री रामनवमी उत्सव २०२३ वीणा, पोथी, फोटो, पाद्यपुजा, रुद्राभिषेक इ. कार्यक्रमाबाबत तक्ता.**

| दिनांक | वेळ | कार्यक्रमात सहभागी होणा-या मान्यवरांची नावे |
|---|---|---|
| २९/०३/२०२३ बुधवार | पहाटे ५.४५ वाजता | उत्सवाचा प्रथम दिवस |
| | | श्रींच्या फोटोची व पोथीची मिरवणूक<br>वीणा- प्र.मुख्य कार्यकारी अधिकारी<br>पोथी– मा.जिल्हाधिकारी महोदय<br>प्रतिमा - १) प्र.मुख्य कार्यकारी अधिकारी<br>२) प्र.मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे सुचनेनुसार |

| | | |
|---|---|---|
| | पहाटे ६.०० वाजता | अध्याय वाचन<br>अध्याय क्र.१ - मा.जिल्हाधिकारी महोदय<br>अध्याय क्र.२ - प्र.मुख्य कार्यकारी अधिकारी<br>अध्याय क्र.३ - प्र.मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे सुचनेनुसार<br>अध्याय क्र.४- प्र.मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे सुचनेनुसार<br>अध्याय क्र.५ - प्र.मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे सुचनेनुसार |
| | सकाळी ७.०० वाजता | श्रींची पाद्यपूजा – मा.जिल्हाधिकारी महोदय |
| ३०/०३/२०२३ गुरुवार | पहाटे ५.४५ वाजता | उत्सवाचा मुख्य दिवस |
| | | श्रींच्या फोटोची व पोथीची मिरवणूक<br>वीणा - मा.जिल्हाधिकारी महोदय<br>पोथी – मा.अध्यक्ष महोदय<br>प्रतिमा- १) प्र.मुख्य कार्यकारी अधिकारी<br>२) डॉ.शैलेश ओक. |
| | सकाळी ७.०० वाजता | श्रींची पाद्यपूजा- मा.अध्यक्ष महोदय |
| ३१/०३/२०२३ शुक्रवार | | उत्सवाचा सांगता दिवस |
| | सकाळी ६.५० वाजता | श्रींची पाद्यपूजा- मा.प्र.मुख्य कार्यकारी अधिकारी |
| | सकाळी ७.०० वाजता | गुरुस्थान येथे रुद्राभिषेक –<br>मा.जिल्हाधिकारी महोदय |

**(कार्यवाही-सामान्य प्रशासन विभाग)**

---

**विषय नं.२६ श्री रामनवमी उत्सव-२०२३ च्या कार्यक्रमांचे नियोजन व उत्सव साजरा करणेसाठी येणारे खर्चाचे अंदाजपत्रकास मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.११० प्रस्ताव मंजूर. सी.ए.दाखल करावा.**

**(कार्यवाही-सामान्य प्रशासन विभाग/विधी विभाग)**

---

**विषय नं.२७ श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाकरीता Medical Oxygen, Nitrous, Carbon dioxide गॅस खरेदी करणेबाबत.**

**निर्णय क्र.१११** **बेस रेट ठरविण्यासाठी ऑनलाईन कोटेशन बोलवून प्रस्ताव पुन्हा सादर करावा. ई-निविदा प्रकिया पुर्ण होईपर्यंत किंवा दोन महिने यापैकी जे आगोदर होईल तो पर्यंत आहे त्याच दराने सध्याचे पुरवठादार यांचेकडून खरेदी करणेस मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही-श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

**विषय नं.२८** **श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालयातील वार्षिक सन २०२३-२४ करीता छपाई व कार्यालयीन स्टेशनरी खरेदी करणेबाबत.**

**निर्णय क्र.११२** **तहकुब.**

**(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

**विषय नं.२९** **सन २०२३-२४ करीता बारा महिन्याचे कालावधीसाठी पाणी पुरवठा विभागास पाणी शुध्दीकरणासाठी आवश्यक ब्लिचींग पावडर, फेरीक ॲलम व क्लोरीन गॅस सिलेंडर खरेदी करणेस व त्यासाठी येणा-या खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.११३** **तहकुब.**

**(कार्यवाही-पाणी पुरवठा विभाग)**

---

**विषय नं.३०** **श्री साई मंदिरात हार, फुले , गुच्छ व प्रसाद सुरु करणेबाबतचे प्रस्तावावर विचार विनियम होऊन निर्णय होणेबाबत.**

**निर्णय क्र.११४** **तहकुब.**

**(कार्यवाही-संरक्षण विभाग)**

---

**विषय नं.३१** **आर्थिक अनुदान मागणीकरीता आलेल्या अर्जांवर निर्णय घेणेबाबत.**

**निर्णय क्र.११५** **तहकुब.**

**(कार्यवाही-लेखाशाखा)**

---

**विषय नं.३२** **माहे जुन-२०२२ ते ऑगस्ट-२०२२ चे जमा खर्च नोंद घेणेबाबत फेरसादर.**

**निर्णय क्र.११६** **तहकुब.**

**(कार्यवाही- लेखाशाखा)**

---

**विषय नं.३३ माहे सप्टेंबर-२०२२ ते नोव्हेंबर-२०२२ चे जमा खर्च नोंद घेणेबाबत फेरसादर.**

**निर्णय क्र.११७ तहकुब. (कार्यवाही- लेखाशाखा)**

---

**विषय नं.३४ माहे डिसेंबर-२०२२ जमा खर्च नोंद घेणेबाबत.**

**निर्णय क्र.११८ तहकुब. (कार्यवाही- लेखाशाखा)**

---

**विषय नं.३५ संस्थानचे सर्व इमारतींचे फायर ऑडीटबाबत.**

**निर्णय क्र.११९ तहकुब. (कार्यवाही-फायर अॅन्ड सेफ्टी विभाग)**

---

**विषय नं.३६ शिर्डी नगरपंचायत हद्दीतील रस्त्यांच्या दैनंदिन स्वच्छता विषयक कामांचा तिमाही परिक्षण अहवाल नोंद घेणेकामी सादर.**

**निर्णय क्र.१२० तहकुब.**

**(कार्यवाही-आरोग्य विभाग)**

---

**विषय नं.३७ श्री साईबाबा महाविद्यालय-(Ad-hoc) सहा.प्राध्यापक, ग्रंथपाल व शारिरीक शिक्षण संचालक भरतीचे अहवालाबाबत.**

**निर्णय क्र.१२१ तहकुब. (कार्यवाही-श्री साईबाबा महाविद्यालय)**

---

**यानंतर मा.अध्यक्ष महोदय यांचे परवानगीने आयत्या वेळेच्या विषयावर चर्चा करण्यात आली.**

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१**

**निर्णय क्र.१२२ श्री साई प्रसादालयाचे चपाती मशिन व मनुष्यबळ या विषयावर चर्चा सुरु असतांना असे निदर्शनास आले की, गोदामातून निर्गमित झालेला अन्न धान्याचा साठा प्रसादालयात त्याप्रमाणात पोहच होतो किंवा नाही याची शहनिशा करण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञाची मदत घेता येऊ शकते. अशाच पध्दतीने हॉस्पिटलसह संस्थानचे इतर सर्व विभागांचे बाबतीतही या आधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोग करुन घेण्यासाठी सॉफ्टवेअर घेण्यासाठी/बनविण्यासाठी सविस्तर अभ्यासपुर्वक प्रस्ताव सादर करण्यात यावा. (कार्यवाही- माहिती तंत्रज्ञान विभाग)**

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.२**

**निर्णय क्र.१२३ प्रसादालयामध्ये भाविकांना देण्यात येणारे खाद्यपदार्थ खाण्यासाठी सुरक्षीत आहेत किंवा नाही याची तपासणी होण्यासाठी यंत्रणेची आवश्यकता आहे. त्यासाठी अन्न व औषध प्रशासनाकडून आवश्यक माहिती घेऊन प्रस्ताव समितीपुढे सादर करावा.**

**(कार्यवाही- श्री साई प्रसादालय विभाग)**

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.३**

**निर्णय क्र.१२४ दोन्ही हॉस्पिटलकरीता नविन संगणके, युपीएस, प्रिंटर्स व सॉफ्टवेअर खरेदीकामी राबविण्यात आलेल्या ई-निविदा प्रक्रियेतील युपीएस साठीचे निम्नतम दरधारक डेल कंपनीचे प्लॅटीनम पार्टनर श्री.आशुतोष पाटील,जळगाव हे आजचे समितीपुढे चर्चेसाठी उपस्थित होते. निविदेतील नमुद दर कमी करण्यास निम्नतम दरधारक इच्छुक नाहीत. १२० दिवसाची मुदत संपलेली आहे. तीन वर्षाऐवजी पाच वर्षांची वॉरंटी असणे संस्थानचे हितावह आहे. एच सिरीज ऐवजी बी सिरीज, क्यु सिरीज किंवा योग्य सिरीज काय राहिल याबाबत तांत्रिक मार्गदर्शनासह फेर ई-निविदा प्रक्रिया राबविणेसाठी प्रस्ताव सादर करावा. सदरची निविदा प्रक्रिया वरील कारणामुळे रद्द करण्यात येत आहे.**

**(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.४ संस्थानचे दोन्ही रुग्णालयांकरीता नविन अद्ययावत तंत्रज्ञान युक्त HMIS संगणकीय प्रणाली व PACS सिस्टीम खरेदी करणेबाबत.**

**निर्णय क्र.१२५ संस्थानचे दोन्ही रुग्णालयांकरीता नविन अद्ययावत तंत्रज्ञान युक्त HMIS संगणकीय प्रणाली व PACS सिस्टीम खरेदी करणेकामी प्रस्तावीत केलेल्या ई-निविदा मुसद्यावर चर्चा करण्यात आली. पुर्वीची ई-निविदा प्रक्रिया रद्द करुन त्यातील त्रुटी दुर करुन नविन ई-निविदा प्रक्रिया प्रस्तावात नमुद केल्याप्रमाणे राबविणेसाठी मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.५**

**निर्णय क्र.१२६** अहमदनगर जिल्हा परिषद शाळेच्या खोल्या बांधकामासाठी १० कोटी अनुदान संस्थानमार्फत पुर्वी देण्यात आलेले आहे. अहमदनगर जिल्हा परिषद शाळांमधील नवीन खोली बांधकामासाठी शाळांची यादी शिक्षण विभाग (प्राथमिक) जिल्हा परिषद, अहमदनगर यांनी सादर केलेली आहे त्याची नोंद घेण्यात आली. त्यानुसार पुढील कार्यवाहीसाठी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अहमदनगर यांना कळवावे.

**(कार्यवाही-लेखाशाखा)**

---

**वरील निर्णय क्र. ८५ ते १२६ सर्वानुमते घेण्यात आले.**

**यानंतर रात्रौ ९.३० वा. सभा समाप्तीची घोषणा करण्यात आली.**

स्वाक्षरीत/-

**(राहूल जाधव)**
**उपमुख्य कार्यकारी अधिकारी तथा**
**प्र.मुख्य कार्यकारी अधिकारी**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.**

स्वाक्षरीत/-

**(सिध्दाराम सालीमठ,भा.प्र.से.)**
**जिल्हाधिकारी, अहमदनगर तथा**
**सदस्य, तदर्थ (Ad-hoc) समिती,**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.**

स्वाक्षरीत/-

**(सुधाकर यार्लगड्डा)**
**प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहमदनगर तथा**
**अध्यक्ष, तदर्थ (Ad-hoc) समिती,**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.**